ARTHA
(Fortnightly)
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 173

वर्ष ३८ | पुणे, बुधवार, २० डिसेंबर, १९७२ | अंक १४

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मजेत हव तस मुक्तपण भटकणाऱ्यासाठी ठाकरसीच मोकळं मोकळं वाटणारं सुती कापड अगदी साजेसे असते: पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड, साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेरिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राउन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

## स्टेट बँक ऑफ इंडिआची न्यूयॉर्कला शाखा

न्यूयॉर्क शहरासारख्या बड्या धनिक शहरात स्टेट बँक ऑफ इंडिआने आपली शाखा गेल्या वर्षी उघडली आहे. त्या वेळी सावध बँक अधिकाऱ्यांनी असा अभिप्राय व्यक्त केला होता की नव्या शाखेला व्यापारी दृष्टीने यश येण्यास निदान तीन वर्षांचा तरी अवधी लागेल. बँकेच्या शाखेचा पहिला वाढदिवस साजरा करण्यासाठी बँकेचे अध्यक्ष श्री. तलवार न्यूयॉर्कला गेले असताना त्यांना मात्र उलटा सुखद अनुभव आला. ते म्हणतात की एका वर्षाच्या अवधीत शाखा आपल्या पायावर तर उभी राहिलीच आहे; पण ती नफाही दाखवू लागली आहे. चालू वर्षाच्या मे ते ऑक्टोबर ह्या काळात शाखेतील ठेवीत १०० टक्के वाढ झाली असून पतपत्रांच्या संख्येत २०० टक्क्यांनी वाढ झाली आहे. कर्जव्यवहारात ६०० टक्के वाढ झाली आहे. न्यूयॉर्कमधल्या बड्या बँकांशी ह्या चिमुकल्या शाखेला नेहमीच स्पर्धा करावी लागते. ही गोष्ट लक्षात घेता बँकेच्या शाखेने आपला जम चांगला बसविला आहे असे म्हणता येईल. न्यूयॉर्कमधील बँकांतर्गत व्यवहारात रुपयाला स्थान मिळवून देण्याचे काम शाखेने केले आहे. अमेरिका आणि कॅनडामधील बँकांना रुपयाचे चलन बाजवी भावात मिळवून देण्याचे कार्यही तिने केले आहे. त्यामुळे अमेरिकन बँकांना हुंडणावळीच्या दरात रात्रीत होणारे बदल टाळून आपल्या ग्राहकांना निश्चित दराने रुपये पुरविता आले. अनेक अमेरिकन कॉर्पोरेशन्स व उद्योगसमूह ह्यांचे भारतात औद्योगिक अगर व्यापारी हितसंबंध आहेत. त्यांची बँकेमार्फत व्यवहार करण्याने चांगली सोय झाली आहे. भारताच्या निर्यातीत नव्या मालाची भर बँकेच्या शाखेने घातली आहे. शाखेत सध्या ३५ लोक काम करतात.

---

## पाकिस्तानी युद्धकैद्यांवर होणाऱ्या खर्चाची वसुली

जम्मू व काश्मीरमधील १९७१ ची युद्धबंदी रेषा ठरविण्याच्या कामी पाकिस्तानने भारताशी जमवून घेतले आहे. आता उभयता देशांनी व्यापलेला परस्परांचा प्रदेश सैन्यमुक्त करण्याच्या मार्गातील मोठा अडथळा दूर झाला आहे. तरी पण राजनैतिक संबंध पुन्हा स्थापन करणे सोपे नाही. भारतात पकडून ठेवण्यात आलेल्या युद्धकैद्यांवर व नागरिकांवर भारताला खूप मोठा खर्च करावा लागतो. ह्या प्रश्नासंबंधी राज्यसभेत संरक्षणमंत्री श्री. जगजीवनराम ह्यांनी अशी माहिती सांगितली की ह्या बाबींवर झालेल्या खर्चापैकी १ कोटी, २८ लाख, १४ हजार रुपये एवढी रक्कम पाकिस्तानकडून वसूल करावी लागेल. युद्धकैद्यांना मायदेशी परत पाठविण्यात येईल त्या वेळी ह्या येण्याचा विचार करावा लागेल. दरम्यान, भारताला रोज १ लाख, २८ हजार रुपये खर्चावे लागत आहेत.

---

## वृत्तपत्राच्या कागदाचे नवे कारखाने

पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात वृत्तपत्रांना लागणारा कागद तयार करण्याचे दोन कारखाने उभारण्यात येण्याची शक्यता आहे. त्यातील एक केरळ राज्यात आणि दुसरा हरयाणा राज्यात असेल. केरळमधील कारखाना सार्वजनिक मालकीचा व हरयाणामधील खाजगी मालकीचा असेल. कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री पुरविण्यासाठी एका ब्रिटिश कंपनीकडे विचारणा करण्यात आली आहे. वृत्तपत्रांना लागणारा कागद तयार करणारे दोन यंत्रसंच घेण्यात यावयाचे आहेत. प्रत्येक संच दररोज २०० टन कागद तयार करू शकेल. सध्या कागदकारखान्याची यंत्रसामग्री तयार करणाऱ्या एका ब्रिटिश कंपनीचे प्रतिनिधी मंडळ भारताच्या दौऱ्यावर आले आहे. प्रतिनिधी मंडळाच्या पुढाऱ्याने अशी माहिती दिली आहे की कलकत्त्याच्या जेसॉप कंपनीने एका ब्रिटिश कंपनीशी सहकार्य करून यंत्रसामग्री तयार करण्याचा करारही केलेला आहे. मात्र संबंधित ब्रिटिश कंपनी जेसॉप कंपनीशी भांडवलात भागीदारी करणार नाही. तिचे कार्य फक्त तांत्रिक ज्ञान पुरविण्यापुरतेच मर्यादित राहील. मुंबईमधील एका कंपनीशीही ब्रिटिश कंपनीने अशा स्वरूपाचा करार केला आहे. कागद तयार करणाऱ्या दोन संपूर्ण कारखान्यांच्या यंत्रसामग्रीसाठी ब्रिटिश कंपनीकडे मागणी नोंदविण्यात आली आहे. यंत्रसामग्रीची किंमत २० लाख पौंड होईल. यंत्रसामग्री तयार करण्याचा कारखाना नागालँडमध्ये उभारण्यात येणार आहे. कारखान्याची मालकी हिंदुस्थान पेपर कॉर्पोरेशन आणि नागालँडचे सरकार ह्यांच्याकडे संयुक्तपणे राहणार आहे. भारतामधील वर्धिष्णु लोकशाहीत जनमानसापर्यंत पोचण्याचे प्रभावी साधन म्हणून अजूनही वृत्तपत्रांकडेच बोट दाखवावे लागते.

---

## दुभत्या गुरांना वाढता धोका

गुजरात राज्यातील बानसकांठा जिल्ह्यात गुरांना लागणाऱ्या चाऱ्याची अतिशय टंचाई भासू लागली आहे. ह्या संकटाला तोंड देऊन दुभती गुरे कशी जगवावी असा मोठा बिकट प्रश्न उभा राहिला आहे. ह्या जिल्ह्यात भरपूर दूध देण्यासाठी प्रसिद्ध अशा काही गुरांच्या जाती आहेत. १९६९ व ७० साली गुजरात राज्यात असाच दुष्काळ पडल्याने ह्या जातींपैकी ५० टक्के गुरे मृत्युमुखी पडली. आता उरलेलीही मृत्यूच्या सावलीत वावरत आहेत. चाऱ्या-पाण्याविना हैराण झालेल्या गुरांना वाचविण्यासाठी बांदवड आश्रम ह्या ठिकाणी गुरांचे शिबिर उघडण्यात आले आहे. हा आश्रम सुमारे ५० चौरस मैलांत पिण्याचे पाणी मिळू शकणारे एकमेव ठिकाण आहे. आश्रमात जास्तीत जास्त गुरांना प्रवेश देण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. तरीही परिस्थिती चिंताजनक आहे.

---

# ☆ अर्थ ☆

बुधवार, २० डिसेंबर, १९७२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## "उद्योगपतींवरील निर्बंध खेदजनक" — टाटा

मध्यप्रदेश सरकारने राज्यात भांडवलाला आकर्षित करण्यासाठी उद्योगपतींची एक बैठक भरविली होती. बैठकीला भारतामधील ७० प्रमुख उद्योगपती हजर होते. बैठकीत भांडवल गुंतवणुकीस उत्तेजन देण्यासाठी काय धोरण स्वीकारावे ह्या विषयी विचार करण्यात आला. उद्योगपतींच्या मेळाव्यापुढे भाषण करताना श्री. नवल एच. टाटा म्हणाले की सरकारने देशापुढे ठेवलेले समाजवादी धोरण स्वीकारण्यात आले पाहिजे ह्यात शंका नाही. तथापि, सरकारच्या गरिबी हटाव ह्या घोषणेचा अर्थ 'उपलब्ध असलेल्या संपत्तीचे वाटप' असाच फक्त करून चालणार नाही. अधिक संपत्ती निर्माण करण्याच्या प्रयत्नांचाही त्या घोषणेत अंतर्भाव करण्यात आला पाहिजे. ह्या बाबतीत डॉ. विश्वेश्वर अय्या ह्यांनी दिलेली 'निर्माण करा अगर नष्ट व्हा' ही घोषणा अत्यंत स्वागतार्ह म्हटली पाहिजे. देशात खाजगी व सार्वजनिक मालकीच्या संयुक्त संघटना स्थापन करण्यास हरकत नाही. पं. जवाहरलाल नेहरू ह्यांच्या हयातीत स्थापन करण्यात आलेली एअर इंडिया ही कंपनी अशीच आहे आणि ती चांगली चालली आहे. गुजरात फर्टिलायझर्स ही कंपनीही ठीक चालत आहे. परंतु देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावण्याचे जे प्रयत्न खाजगी उद्योगधंदे करीत आहेत त्यांच्यावर निर्बंध घालण्याचे धोरण कितपत शहाणपणाचे आहे ? उद्योगधंद्यांच्या स्थापनेबाबत राज्यांना अधिक मोकळीक असली पाहिजे. टाटा उद्योगसमूहाने सादर केलेले चार औद्योगिक प्रकल्प मध्यवर्ती सरकारच्या दप्तरात पडून आहेत, त्यांना जीवनमृत असेच संबोधावे लागेल.

खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांचे कार्य आणि सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांचे कार्य ह्याबद्दल कोणत्याही वादाला जागा नाही. आर्थिक विकासाच्या कामात दोघांनाही भरपूर वाव आहे. औद्योगिक विकासासाठी लागणारा पाया सार्वजनिक मालकीचा विभागच घालू शकेल. विकासाच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या अर्थव्यवस्थेत ह्याच विभागाला मूलभूत उद्योगधंद्यांची उभारणी करता येईल. परंतु सरकारने काही विवक्षित व स्पष्ट आखलेल्या क्षेत्रातच आपले काम करावे. औद्योगीकरणाची जी उरलेली क्षेत्रे राहतील त्यात खाजगी मालकीचे उद्योगधंदे काढणाऱ्या उद्योगपतींना स्वातंत्र्य देण्यात यावे. ह्या बाबतीत राज्य सरकारांचीही काही जबाबदारी आहे. एखाद्या प्रकल्पाची संपूर्ण जबाबदारी जर राज्य सरकारावर टाकण्यात येत असेल तर मध्यवर्ती सरकारने राज्य सरकारला जरूर ते अधिकारही दिले पाहिजेत, ह्याची जाणीव राज्य सरकारांनी भारत सरकारला करून दिली पाहिजे. विकास कार्यासाठी लागणारी परिस्थिती निर्माण करणे आणि भांडवलाची वाढ करणे ह्या बाबतीत निर्णय घेण्याचे अधिकारही राज्य सरकारांना मिळाले पाहिजेत. नाही तर जबाबदारी व निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य ह्यांच्यात सुसंगती राहणार नाही आणि औद्योगिक विकासाच्या कामात अडचणी निर्माण होतील. राज्य सरकारे आणि मध्यवर्ती सरकार ह्यांच्यात सध्या अनेक बाबतींत वाद उत्पन्न झाले आहेत. त्यात येथे भाग घेण्याची गरज नाही. परंतु तरी सुद्धा एक मुद्दा स्पष्ट करण्यात आला पाहिजे. राज्य सरकारांनी औद्योगिक विकासाच्या कामात मनापासून भाग घ्यावा अशी जर इच्छा असेल तर राज्य सरकारांना जरूर ते स्वातंत्र्य व निर्णय घेण्याच्या बाबतीत मोकळेपणा मिळाला पाहिजे. नाहीतर विकासाची इच्छा आणि ती कार्यवाहीत आणण्याचे प्रयत्न ह्यांना योग्य दिशा लाभणार नाही.

---

## मिश्र अर्थव्यवस्थेचे सावध स्वागत

दिल्ली येथे आर्थिक विषयावर लिहिणाऱ्या पत्रपंडितांचा एक आंतरराष्ट्रीय परिसंवाद भरविण्यात आला होता. पत्रपंडितांच्या ह्या मेळाव्यापुढे बोलताना फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संघटनेचे अध्यक्ष श्री. मदनमोहन मंगलदास ह्यांनी पुढील विचार व्यक्त केले. ते म्हणाले की देशाने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला आहे. आता ती सोडून देणे घातक ठरेल. भारतात सध्या संमिश्र अर्थव्यवस्था ज्या पद्धतीने राबविण्यात येते ती पद्धत अवघड आहे. त्यापेक्षा तुलनेने अधिक मुक्त असलेली अर्थव्यवस्था अगर मध्यवर्ती केंद्राकडून राबविली जाणारी अर्थव्यवस्था राबविणे अधिक सोपे आहे. तथापि, सध्या ज्या कल्पना आणि ध्येये पुढे ठेवण्यात आली आहेत त्यांच्या चौकटीत राहूनच मिश्र अर्थव्यवस्थेतील दोष काढून टाकण्यात आले तर उत्पादनाचा वेग त्वरेने वाढू शकेल आणि त्याचबरोबर राहणीचे मानही उंचावू शकेल. लोकशाही राज्यपद्धत खर्चाची आहे म्हणून तिचा त्याग करणे जसे धोक्याचे ठरेल तसेच मिश्र अर्थव्यवस्था राबविणे अवघड आहे म्हणून ती रद्दबादल करणे धोक्याचे ठरेल. आर्थिक नियोजनाच्या आवश्यकतेबद्दल वाद

घालण्याची जरूर नाही. नियोजन पाहिजे ह्यात शंकाच नाही; पण गरज आहे ती आर्थिक कार्यक्रम नीट आखण्यात आले पाहिजेत आणि त्यांची अंमलबजावणी योग्य रीतीने करण्यात आली पाहिजे. आर्थिक नियोजनाच्या कार्यक्रमामुळे अपेक्षित फलनिष्पत्ती झाली नसेल तर तो दोष टोकाकडे झुकलेल्या ध्येयवादाचा म्हणावा लागेल. खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांचे कार्य संपलेले नाही.

स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी खाजगी उद्योगधंद्यांनी आर्थिक विकासाचे काम तडफेने आणि जोराने केलेले आहे. आजही हे उद्योगधंदे असे कार्य करीत आहेत आणि पुढेही करीत राहतील. पण, त्यासाठी खाजगी मालकीच्या विभागाचा पाया अधिक विस्तृत करण्यात आला पाहिजे. तसे करण्यात आले तर ह्या विभागातर्फे आर्थिक विकासात पडणारी भर अधिक प्रमाणात पडू लागेल. त्याचबरोबर त्यांच्यावर घालण्यात येणारी निर्बंधांची पकड सैल करण्यात आली पाहिजे. सध्या कोणताही आर्थिक व्यवहार निर्बंधांच्या कचाट्यातून मुक्त राहिलेला नाही. ह्या बाबतीत कंपनी कायदा दुरुस्ती बिलातील अनेक नव्या तरतुदी आणि परदेशीय चलनविषयक नियमांसंबंधीचे बिल ह्यांच्याकडे बोट दाखविता येईल. सार्वजनिक मालकीच्या विभागांची उद्दिष्टे काय आहेत हे एकदा स्पष्ट करण्यात आले पाहिजे. सध्या ह्याविषयी बराच गोंधळ आहे. तो नाहीसा केल्याशिवाय ह्या विभागांतील औद्योगिक संघटना स्वतःच्या पायावर स्थिर उभ्या राहू शकणार नाहीत. गेल्या २५ वर्षांचा इतिहास पाहता एकंदरीने अर्थव्यवस्थेने चांगले काम केले आहे. ह्याचा अर्थ तिची गती कधीच मंदावली नाही असा नाही. पण, आज हिंदच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाची शक्यता अधिक वाढलेली दिसून येते. विकास गतिमान राखण्यासाठी तीन गोष्टींची गरज आहे. एक तर आकांक्षांच्या उद्दीपनाच्या मानाने त्यांचे समाधान करण्याची शक्ती अधिक वेगाने वाढविली पाहिजे. दुसरी गोष्ट लोकसंख्या रोखण्यात आली पाहिजे, म्हणजे लोकांचे उत्पन्न उत्पादनाच्या वाढीकडे लावता येईल. तिसरी गोष्ट म्हणजे परदेशीय चलनाची स्थिती सुधारण्यासाठी निर्यातीकडे अधिक लक्ष देण्यात आले पाहिजे.

---

### अजित वाडेकरांच्या पुस्तकासाठी स्पर्धा

अजित वाडेकरांच्या पुस्तकाच्या ('माय क्रिकेटिंग इअर्स—ॲज टोल्ड टु के. एन्. प्रभु) खपासाठी एका स्पर्धेची अभिनव योजना आखण्यात आली आहे. "माय क्रिकेटिंग इअर्स हे पुस्तक मी आवडीने वाचले, कारण......... " हे वाक्य पुरे करण्यासाठी १५ पेक्षा जास्त नाहीत एवढे शब्द स्पर्धकाने सुचवावयाचे आहेत. पहिल्या नंबराला जेके टेलिव्हिजन सेट, दुसऱ्या नंबराला बुश टेपरेकॉर्डर आणि तिसऱ्या नंबराला तीन बॅंडचा ट्रॅन्झिस्टर रेडिओ मिळणार आहे. उत्तेजनार्थ, अजित वाडेकरांची सही असलेल्या २० क्रिकेट बॅटी आणि प्रत्येकी चार बेल पुस्तकांचे ८० सेट्स वाटण्यात येतील. टी. व्ही. सेट, टेप रेकॉर्डर आणि ट्रॅन्झिस्टर रेडिओ ह्यापेक्षा अजित वाडेकरांची सही असलेल्या बॅटीला इतके कमी महत्त्व दिले जाणे औचित्यास सोडून दिसते.

### शस्त्रास्त्रनिर्मिती आणि विकासकार्य ह्यांचा संबंध

संयुक्त राष्ट्र संघटनेचे सरचिटणीस मि. कुर्ट वाल्डाइम ह्यांनी जगातील शस्त्रास्त्रांची निर्मिती आणि आर्थिक विकासाचे कार्यक्रम ह्यांमधील दुवे अभ्यासण्यासाठी ९ तज्ज्ञांची एक समिती नियुक्त केली होती. समितीला आपल्या पाहणीत असे आढळून आले की जगातील देश दरसाल शस्त्रास्त्रांच्या उत्पादनासाठी २०,००० कोटी डॉलर्स अथवा १,४६,००० कोटी रुपये खर्च करीत आहेत. ह्या प्रचंड खर्चाशी तुलना करता गरीब देशांना मदत देण्यासाठी अवघी ८,००० कोटी डॉलर्स अथवा ५८,४०० कोटी रुपये रक्कम खर्च केली जाते. अभ्यास गटाने आपल्या अहवालात असे म्हटले आहे की निःशस्त्रीकरण आणि विकास ह्यांच्यात परस्पर संबंध आहे. कारण, शस्त्रास्त्रे निर्माण करण्याच्या स्पर्धेत जो अफाट खर्च केला जातो तोच आर्थिक विकास आणि प्रगती घडवून आणण्यासाठी वापरता येईल. निःशस्त्रीकरण घडवून आणण्याबाबत जर आंतरराष्ट्रीय एकमत झाले तर तो फार मोठा राजकीय बदल झाला असे म्हणता येईल. अशा एकमतामुळे शांततामय कार्यासाठी फार मोठी साधनसामग्री मोकळी होऊ शकेल. एका अर्थाने निःशस्त्रीकरणापासून उत्पन्न होणारा हा नफाच म्हटला पाहिजे. कारण त्यामुळे गरीब देशातील लोकांच्या अन्न, वस्त्र, वाहतूक, जळण इत्यादी मूलभूत गरजा भागविण्यास पैसा उपलब्ध होऊ शकेल. आजही एक गोष्ट करता येण्यासारखी आहे. लष्करी दृष्ट्या उपयुक्त असे कारखाने काढण्यात येतात त्याच वेळी त्यात गुंतलेल्या साधनांची शांतताकालीन कामासाठी कसा उपयोग करता येईल ह्याविषयीचे नियोजन आगाऊ तयार ठेवण्यात यावे. म्हणजे परदेशांतून सैन्ये काढून घेतल्यावर त्याचा तातडतोब उपयोग करता येणे शक्य होईल.

---

## उद्‌बोधक उद्‌गार

### विजेच्या मोटर्सपेक्षा डिझेल इंजिने श्रेयस्कर

"डिझेल इंजिनपेक्षा इलेक्ट्रिकल मोटर्स चालविण्याचा खर्च सकृत्दर्शनी स्वस्त वाटला तरी वीजनिर्मिती, त्याचे वाटप यावरील खर्च आणि सरकारतर्फे ग्रामीण भागात वीज नेण्यासाठी देण्यात येणारी मदत ही लक्षात घेतली तर ग्रामीण विद्युतीकरणाचा खर्च डिझेल इंजिनांचा वापर करण्यापेक्षा कोणत्याही तऱ्हेने स्वस्त नाही असे आढळून येईल. १९७२–७३ साली सुमारे २,६५,००० नव्या इलेक्ट्रिक मोटर्स बसविण्याची सरकारची योजना आहे. यापैकी एकतृतीयांश मोटर्स ऐवजी डिझेल इंजिने बसविण्याचे ठरले तर ५०० मेगॅवॅट किंवा कोयनेतून एकंदर होणाऱ्या निर्मितीपेक्षा अधिक वीज वाचू शकेल. तेव्हा पुढील काही वर्षे वीज टंचाई असताना डिझेल इंजिनांचा वापर वाढविणे हे केव्हाही देशाला हितावह ठरणार आहे."

— रा. द. पुसाळकर

इंडियन डिझेल इंजिन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष

## संरक्षणविषयक उत्पादनात घट होणार नाही

देशात संरक्षणविषयक सामग्रीचे उत्पादन करणारे ३० कारखाने आहेत. गेल्या वर्षी त्यांनी उत्पादनाच्या बाबतीत उच्चांक गाठला होता. उत्पादनाचा हाच वेग पुढे चालू ठेवण्यात येणार आहे. ह्यापूर्वी एखादी आणीबाणीची परिस्थिती निवळली की संरक्षणविषयक उत्पादनही उताराला लागत असे. शांतता कालात इतक्या उत्पादनाला अर्थातच मागणी नसते. म्हणून सैन्याचे शिक्षण आणि संभाव्य युद्धासाठी जरूर असणारा राखीव साठा वगळून बाकीच्या उत्पादनाला व्यापारी पद्धतीने निर्यातीचा मार्ग दाखविण्यात येणार आहे. गेल्या तीन वर्षांत शस्त्रास्त्रांची निर्यात अवघी ३ कोटी रुपयांची झाली. ह्या वर्षी १० कोटी रुपयांपर्यंत ती वाढली आहे. भारताच्या शस्त्रास्त्रांना मागणी येते ती मुख्यतः आफ्रिका खंडातील देश, अरब देश आणि आशियातील देश ह्यांच्याकडून आणि तीही विनासायास. भारताला मागणीसाठी काही खटपट करावी लागत नाही. ह्या बाबतीत जरा अधिक खटपट करण्यात आली तर ह्या भूभागातील विकसनशील देशांकडून मोठ्या प्रमाणावर मागणी येण्याची शक्यता आहे. सुमारे ५० कोटींपर्यंत मागणी येऊ शकेल. शस्त्रास्त्रांची निर्यात करताना जे देश भारताचे स्नेही आहेत त्यांना अगर जे देश विकलेली शस्त्रास्त्रे भारताच्या शत्रूंना देणार नाहीत त्यांनाच ती पुरविण्याची काळजी घेण्यात येते. फिजी, सिंगापूर, सीलोन, बांगला देश, इत्यादींची संरक्षक मंडळे अलीकडे भारताला भेट देऊन गेली. त्यांनी देशात तयार होणाऱ्या अनेक प्रकारच्या शस्त्रसामग्रीबाबत बरीच चवकशी केली. भारताकडून निर्यात होणारी शस्त्रास्त्रे आक्रमक अगर संहारक अशी असत नाहीत. अंतर्गत सुव्यवस्था राखण्यासाठी उपयोगी पडतील अशा प्रकारची ती मुख्यतः असतात.

---

## परदेशीय औषध कंपन्यांची नफेबाजी

भारतात परदेशीय कंपन्या काही औषधे बनवीत असतात. ह्या औषधांपैकी काही औषधे आयात करण्यात आली तर ती बरीच स्वस्त मिळतील असा निष्कर्ष श्री. बी. व्ही. रंगराव ह्यांनी काढला आहे. दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील ते एक जबाबदार तज्ज्ञ असून त्यांनी 'औषध कंपन्यांतील परदेशीय तंत्रसाह्य' ह्याविषयी एक निबंध लिहिला आहे. तंत्रज्ञानाची देवाणघेवाण ह्या विषयावर दिल्ली येथे एक आंतरराष्ट्रीय परिसंवाद भरणार आहे. त्यात वरील निबंध वाचण्यात येणार आहे. परदेशी कंपन्या औषधांना लागणारी काही द्रव्ये आयात करतात आणि त्यांचा उपयोग करून परदेशांतील नावांची काही औषधे तयार करतात व भरमसाट भावाने विकतात असा त्यांचा अभिप्राय आहे. अशा प्रकारची दोन ठळक उदाहरणेही त्यांनी दिलेली आहेत. त्यांतील एक असे आहे. एका विशिष्ट औषधासाठी लागणारे द्रव्य परदेशांतून ३३५ रुपये किलोग्रॅम ह्या भावाने आयात केले जाते, तर त्यापासून बनविण्यात येणारे औषधच परदेशांत १०० रुपये किलोग्रॅम ह्या भावाने मिळू शकते. दुसऱ्या एका औषधासाठी लागणारी द्रव्ये २४३ रुपये किलोग्रॅम ह्या भावाने आयात केली जातात. वास्तविक हे औषध भारतात मिळणाऱ्या द्रव्यांचा उपयोग करून तयार करता येण्यासारखे आहे. एका छोट्या कंपनीने त्याचे उत्पादन आता सुरूही केले आहे. काही औषधे परदेशांतील बाजारपेठांतून रद्द झालेली असली तरीही त्यांचे उत्पादन भारतात चालूच आहे. परदेशी कंपन्यांना औषधनिर्मितीचे परवाने दिलेले असल्यामुळे देशातील कारखानदार त्यांचे उत्पादन करण्याची जोखीम घ्यावयास तयार नाहीत.

---

## अमेरिकन अर्थशास्त्रज्ञाचा सल्ला

अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय विकास मंडळात काम करणारे प्रा. एडगर ओवेन्स ह्यांनी मुंबई येथे इंडियन मर्चंटस चेंबरच्या सभागृहात बोलताना भारताच्या आर्थिक विकासासंबंधी आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले की भारतात गुंतविल्या जाणाऱ्या प्रत्येक रुपयामागे देशाचे ठोक उत्पन्न निदान ५० टक्क्यांनी तरी वाढले पाहिजे; तरच देशापुढे ठेवण्यात आलेली सामाजिक उद्दिष्टे गाठणे शक्य होईल. विकसनशील देशांचा विचार करताना एक गोष्ट लक्षात येते. ह्या देशात भांडवलाचा विकास आणि सामाजिक न्याय ह्यांच्यात विरोध दिसून येतो. हा विरोध टाळावयाचा तर देशाच्या ठोक उत्पन्नात अनेकांनी भर घातली पाहिजे; म्हणजे अनेकांना त्याच्यात वाटा मिळू शकेल. पाश्चिमात्य देशांत ज्या तऱ्हेने आर्थिक विकास घडून आला त्या तऱ्हेने विकसनशील देशांत विकास घडवून आणण्याचे प्रयत्न व्यर्थ आहेत. पश्चिम युरोप, पूर्व युरोप अगर उत्तर अमेरिका ह्या भूभागांतील आर्थिक विकास भांडवलाच्या संचयाला प्राधान्य देऊन करण्यात आला. तेथे मानवी श्रम वाचविण्यावर अधिक जोर देण्यात आला. परंतु भारतात व इतर अविकसित देशांत ही पद्धत चालणार नाही. ह्या देशांतून मानवी श्रमाला प्राधान्य देऊनच आर्थिक विकास साधावा लागेल. त्यासाठी ज्या छोट्या उद्योगधंद्यांतून माणसाचे श्रम अधिक प्रमाणात लागतील अशा उद्योगधंद्यांना अग्रहक्क देण्यात आला पाहिजे. त्याच बरोबर अशा छोट्या उद्योगधंद्यांतून फायद्याचे प्रमाण अधिक असले पाहिजे आणि बचत करून अधिक पैसा गुंतविण्यास व विस्तार करण्यास त्यात वाव असला पाहिजे.

## दातांच्या दृष्टीने थंडपेक्षा उष्ण पेये बरी

दातांच्या आरोग्याच्या दृष्टीने थंड पेयांपेक्षा उष्ण पेये बरी. उटा ( अमेरिका ) विद्यापीठातील एका ताज्या संशोधनानुसार, दातावरील एनॅमल उष्ण पेयामुळे तापले म्हणजे ते प्रसरण पावते पण त्यामुळे दुष्परिणाम घडून येत नाही. परंतु थंड पेयामुळे हे एनॅमल एकदम आकुंचन पावले तरी त्याच्या आतील भाग पूर्वीच्याच आकाराचा राहतो आणि एनॅमलला आतून दाब सहन करावा लागतो. ( एनॅमल हे चांगले उष्णतावाहक नाही. ) उष्ण पेये घेताना तोंडातील उष्णतामान ६०° सें. पर्यंत वाढते तर आइस्क्रीम खातेवेळी ते १·२° सें. पर्यंत खाली उतरते. कडक बर्फ चावून खाणे दातांना सर्वांत अपायकारक आहे.

## बढती कोणाला ?

'अर्थ' पाक्षिकाच्या दि. १५ नोव्हेंबर १९७२ च्या अंकात 'बढती कोणाला ?' हा मा. गि. के. मंदित यांचा लेख व त्यावर श्री. आर. डी. कुलकर्णी, कोळपेवाडी (जि. अहमदनगर) यांनी लिहिलेली प्रतिक्रियाही वाचली.

श्री. आर. डी. कुलकर्णी यांच्या मते श्री. रानडे यांना बढती दिली असेल किंवा रानडे यांना बढती द्यावी असे वाटते. कोणासही बढती देताना सर्वसाधारण त्याच्या कामाचा दर्जा, वक्तशीरपणा, चोखपणा, संस्थेबद्दल त्याची निष्ठा, त्याने केलेला सेवेचा कालावधी वगैरे बाबी मुख्य समजल्या जातील किंवा जाव्यात असे गृहीत असते किंवा अलिखित न्यायाने ठरलेले असते. पण व्यवहारात ते फारच थोड्या ठिकाणी पाहावयास मिळते.

रिपोर्ट देणाऱ्या श्री. साधलेंच्या मनाच्या धारणेवरही अवलंबून आहे. त्यांनी दिलेले शेरे वाचले म्हणजे ते निश्चितच रानडे यांना अनुकूल नाहीत; मात्र सातपुते यांना अनुकूल आहेत. शिवाय महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्री. साधले यांनी स्वतःची बढती वरिष्ठांच्या पुढे पुढे करून मिळविली असेल तर त्यांच्या पुढे पुढे करणाऱ्या श्री. सातपुते यांनाच बढती मिळाली असेल. आणि रानडे हे फक्त सिनिऑरिटी, सेवा, निष्ठा, वगैरे दाखवून तत्त्वाने भांडत राहतील व त्यांना यश कितपत येईल शंकाच आहे.

बढती देताना काय काय गुणवत्ता ठरवावी ही गृहीते आहेत साध्ये नाहीत हे निश्चित. काहींना ते जमते, काहींना जमत नाही एवढाच फरक आहे. त्यामुळे माझ्या समजुतीप्रमाणे श्री. सातपुते यांना बढती मिळाली असेल असेच वाटते. निर्णय योग्य किंवा अयोग्य हा प्रश्न वाचकांनीच ठरवावा.

अशा प्रकारचे प्रसंग व्यवहारात नित्य घडत असतात ते प्रत्यक्ष जरी नावाने छापले नाहीत तरी टोपणनावाने वाचकासमोर ठेवावेत ही विनंती.

## तरुणांची कुचंबणा

व्यवस्थापनातील समस्या (२) (नव्या शिक्षणाच्या, ताज्या रक्ताच्या तरुणांची कुचंबणा) हा श्री. सु. बि. मेहवळे यांनी लिहिलेला लेख वाचला.

चंद्रकांत उच्च शिक्षण घेतलेले असल्यामुळे, निश्चितच बुद्धिमान असणार, तरुण असल्यामुळे धडाडी, धमक, उत्साह वगैरे गोष्टीही असणार हे गृहीत धरणेस हरकत नाही. शिवाय अमेरिकेतील राहणीमानाचा व विचारांचा त्यांच्या मनावर परिणाम होणार हेही निश्चितच. त्यामुळे श्री. चंद्रकांत यांनी श्री. जोशी यांना न डुलवता पण सेठ जवाहरलाल यांना विश्वासात घेऊन सर्व कल्पना देऊन त्यांच्यामार्फत निर्णय देणे भाग पाडावे व जरूर त्या सुधारणा घडवून आणाव्यात.

या उलट श्री. जोशी हे बोलूनचालून नोकर. कितीही तळमळीने काम केले तरी मालकाला नफा, नुकसान दाखवणे हे त्यांचे काम. कोणती गोष्ट हिताची व कोणती अनहिताची हे निःस्पृहपणे सांगावे व व्यवस्थापकीय निर्णय मानावा हेच उचित. किंवा ताज्या रक्ताला आवरणे असल्यास आपण प्रत्यक्ष सांगण्यापेक्षा जवाहरलाल यांचे मार्फत सांगणे जास्त ठीक; त्यात कमीपणा नाही.

श्याम रघुनाथ साखरे

दि. १९-१२-७२ कॅशिअर

बँक ऑफ महाराष्ट्र, तासगाव शाखा

---

## सुबत्तेमधून निर्माण झालेली सामाजिक अस्वस्थता

ब्रिटिश सरकारने समाजस्थितीतील वाहते वारे दिग्दर्शित करणारा एक भला मोठा खंड प्रसिद्ध केला आहे. त्यामधील माहिती आकडेवारीने लाभणाऱ्या पुराव्याच्या कसास उतरणारी आहे. १९६१ ते १९७१ ह्या दशकातील ब्रिटिश समाजाचे दर्शन घडवताना ह्या ग्रंथात असे चित्र रेखाटण्यात आले आहे. ह्या दशकात कुटुंबांचे साप्ताहिक सरासरी उत्पन्न ९४ टक्क्यांनी वाढले त्याच काळात मालाच्या किरकोळ किमती फक्त ५० टक्क्यांनी वाढल्या. परंतु ह्या वाढत्या उत्पन्नाचा फार थोडा भाग अन्नपदार्थावर खर्च करण्यात आला. सगळ्यात अधिक वाढता खर्च मोटारी, दारू, मनोरंजन आणि घरे ह्या बाबींवर करण्यात आला. दरम्यान ह्याच दशकात ब्रिटनमध्ये हिंसाचार वाढीला लागला. लग्ने व त्याचबरोबर घटस्फोटही लवकर होऊ लागले. संपांचे प्रमाण वाढले. भ्रूणहत्यांच्या संख्येत आणि अनौरस संततीत ह्या शतकात पूर्वी कधीही झाली नाही इतकी वाढ वाढली. १९६१ मध्ये खून व इतर हिंसाचारांचे गंभीर प्रकार १२,३०४ घडले होते. गेल्या वर्षी अशा गुन्ह्यांची संख्या २९,८१४ इतकी मोठी होती. १९३८ सालामध्ये अशा प्रकारच्या गुन्ह्यांची संख्या अवघी १,७०६ होती. १९७० ते १९७१ मध्ये घटस्फोटांची संख्या एकदम १५ हजारांनी वाढली. ह्याचे कारण घटस्फोट मिळविण्यासाठी लागणाऱ्या कारणांबाबत कायद्यात दुरुस्ती करण्यात आली होती. ह्याचाच अर्थ असा की नाइलाजाने लग्नाच्या बेडीत अडकलेल्यांची संख्या दबलेली होती. घटस्फोटित स्त्रियांत पुन्हा विवाह करण्याची वृत्तीही वाढलेली दिसत आहे. १९६१ साली ३७ हजार घटस्फोटित महिलांनी पुन्हा विवाह केला होता. १९७१ साली त्यांची संख्या ६१,००० इतकी झाली. विवाहाच्या वेळी असणारे पुरुषांचे वय २५ वरून २४ वर आले आहे तर स्त्रियांचे वय २३ वरून २२ वर आले. भरभराट आणि स्थैर्य ह्यांचा अतूट संबंध असावा असे ह्यावरून दिसत नाही.

---

# व्यवस्थापनातील समस्या (३)

## प्यादेगिरीचे कसब रंकाचा राव बनविते!

लेखक : गि. के. पंडित, एम. ए., एलएल. बी., ए. सी. ए.

अलीकडे खाजगी उद्योगधंद्यांची जशी वाढ होत गेली तसे सरकारी नोकरीचे आकर्षण कमी होऊन खासगी नोकऱ्या बऱ्या वाटू लागल्या. खाजगी नोकरीमध्ये बदलीचा संभव कमी, वेतनही सरकारी नोकरीपेक्षा चांगले व सरकारी नोकरीमध्ये सगळे सिनिऑरिटी व नियमानुसार चाललेले, तसा प्रकार खाजगीमध्ये नाही. मालकास किंवा आपल्या वरिष्ठास खूष ठेवले म्हणजे झाले. वेतनवाढही मग नियमापेक्षा कितीतरी जास्त. त्यामुळे सरकारी नोकरीतील निश्चिततेपेक्षाही फायदे देणारी अनिश्चितता नोकरवर्गास बरी वाटू लागली. खाजगी नोकरीत केवळ आपले काम प्रामाणिकपणे व कौशल्याने करणे एवढ्यावरच त्या नोकराचे भवितव्य अवलंबून नसून तो आपल्या वरिष्ठांस खूष कसे ठेवतो यावरही त्याची योग्यता ठरविली जाते. त्याची उपयुक्तता ही केवळ त्याच्या नेमून दिलेल्या कामाच्या उरकाने अजमावली न जाता इतर अनेक गोष्टींनी तोलली जाते. हे त्याच्या लक्षात न आल्यास काम व्यवस्थित करूनही तो मागे राहातो व त्याचा वारंवार मनोभंग होतो.

यासाठी आपल्या वरिष्ठांस काय आवडते हे नोकराने अभ्यासपूर्वक समजावून घेतले पाहिजे व न बोलता त्या गोष्टी आचरणात आणल्या पाहिजेत. एवढे पथ्य त्याने संभाळल्यास त्याची जलद प्रगती झालीच असे समजावे. या बाबतीत अगदी सामान्य कामापासून सुरुवात करून वरच्या ऑफिसरची जागा पटकावलेले श्री. रामराव कुलकर्णी यांची प्रगती कशी होत गेली हे त्यांच्याच शब्दांत ऐका:—

"मी बी. ए. परीक्षा तृतीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण झालो व नोकरीच्या शोधात अनेक ठिकणी हिंडलो. माझी अभ्यासातील प्रगती अगदी सामान्य असल्याने बहुतेक ठिकाणी सरळ नकारघंटा ऐकावी लागली. शेवटी एका कंपनीत माझ्या एका मित्राच्या ओळखीने मी प्रवेश केला. काम होते अत्यंत हलके; म्हणजे जवळ जवळ शिपायाचेच म्हणाना—इकडचे कागद तिकडे पोचवणे, साहेबांच्या चहाची व्यवस्था करणे, त्यांची वैयक्तिक कामे करणे, म्हणजे त्यांचे बँकेतील पैसे काढणे, भरणे, त्यांचे निरोप पोचवणे, घरची कामे वेळोवेळी करणे व उरलेल्या वेळात ऑफिसात येऊन बसणे. ऑफिसात मला फारसे काम नसे पण साहेबांची बाहेरची कामे करून मी पुन्हा ऑफिसात परत येतो हे साहेबास आवडते हे मी केव्हाच हेरले होते. माझ्या आधीचा मनुष्य साहेबांची गावातील कामे ३॥/४ ला संपल्यास व ऑफिसची वेळ ४॥ वाजता संपत असल्यामुळे तो पुन्हा ऑफिसात येण्याची टाळाटाळ करी. नेमक्या याच गोष्टीमुळे त्याला नोकरी गमवावी लागली. त्यामुळे मी हे कटाक्षाने टाळले व साहेबांचे मन प्रथमपासूनच जिंकले.

पुढे खात्यामध्ये एका कारकुनाची जागा रिकामी झाल्यावर व मी बी. ए. असल्यामुळे माझीच तिथे वरणी लागली हे सांगावयाच नकोच व नोकरी लागल्यापासून सुमारे १० महिन्यांत माझी पहिली बढती झाली. मी जरी क्लार्क झालो तरी साहेबांच्या व्यक्तिगत कामाची जबाबदारी मी उचलतच होतो. या कामामुळे ऑफिसातील माझे कामही बेताबाताचे असावयाचे. तरीही साहेबांची माझ्यावरील मर्जी वाढतच होती.

त्यानंतर सुमारे १ वर्षाने फिरतीचे काम करणारा एक मनुष्य नेमण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्या जागेचा पगार जवळजवळ मला मिळत असलेल्याच्या दुप्पट होता व शिवाय प्रवास भत्ता निराळा. ऑफिसातील अनेकांची इच्छा ही जागा मिळावी अशी होती. पण मी साहेबास भेटून विनंती केली व त्यांची कामे माझा धाकटा भाऊ माझ्या ऐवजी करील याची खात्री दिली. शेवटी साहेबांनी माझीच निवड केली व मी दुय्यम दर्जाचा अधिकारी बनलो. अर्थात मला ही अधिकाराची, अधिक पगाराची जागा मिळाल्याचा मत्सर ऑफिसातील इतर सहकाऱ्यांस प्रथम वाटला पण काळाच्या ओघात व मी महिन्यातील २० दिवस परगावीच असल्यामुळे मला तो जाणवला नाही इतके खरे. माझ्या फिरतीमध्ये मी वारंवार व नियमितपणे साहेबांशी संपर्क साधत असे व ठिकठिकाणी ज्या खास वैशिष्ट्यपूर्ण वस्तू मिळत त्या साहेबास भेट देत असे. परगावी काम मनात भरण्यासारखे न झाल्यास या भेटवस्तूंची किंमत व संख्या वाढवत असल्याने माझे काम नेहमी समाधानकारकच ठरले गेले. फिरतीवरून परत ऑफिसच्या गावी येताना मी सरळ वाहान किंवा हमाल घेऊन स्टेशनवरून ऑफिसमध्येच येई व साहेबास रिपोर्ट करून मगच घरी जाई. यासाठी ऑफिसच्या वेळेमध्ये गावी पोचणारी गाडीच मला पकडावी लागे.

कित्येक वेळा मी रजा काढत असे व मग कामासाठी ऑफिसात जात असे. अशा वेळी मला ऑफिसात पाहून साहेबास आश्चर्य बरे वाटे व माझे उदाहरण ते इतरांस नेहमी देत. पण ही माझी युक्ती पूर्वनियोजित असे याची कुणालाच कल्पना नव्हती. त्यामुळे इतर अनेक कष्टाळू नोकरांपेक्षा माझी कामातील तळमळ उठून दिसे. कित्येकदा अमृतांजन डोक्यास चोपडून व औषधाची बाटली जवळ ठेवूनही मी काम करीत असे व त्यामुळेही ऑफिसच्या कामास मी माझ्या प्रकृतीपेक्षाही जास्त महत्त्व देतो हे इतरांच्या व विशेषतः साहेबांच्या निदर्शनास येई.

ऑफिसमधील कुणाच्याही घरी काही मंगल कार्य असो, मी त्यांच्या दारात हात जोडून स्वागतासाठी उभा ठाकलेलाच

असायचा. रिसेप्शनच्या ठिकाणी सर्व्हिसचे दगदगीचे काम करण्यापेक्षा हे स्वागताचे काम सर्वांत सोपे व त्यामुळेमोठ मोठ्या लोकांच्या ओळखीही व्हावयाच्या. काम करण्याबरोबरच काम केलेले दिसावे याबद्दल नोकराने दक्ष राहावयास हवे. माझ्या मते हाच खरा कर्मयोग आहे.

पूर्वी फिरती नसे त्या वेळी माझी बहुतेक खाजगी कामे मी साहेबांच्या कामासाठी बाहेर जाई त्या वेळीच करून टाकीत असल्याने मला रजा अगदी क्वचितच काढावी लागे. तेव्हा रजा कमी काढण्याच्या बाबतीतही साहेब माझ्यावर खूष असत. त्यामुळे योग्य कारणासाठी रजा काढणारासही साहेब माझे उदाहरण देत. नंतर फिरती सुरू झाल्यावर तर रजेचा प्रश्नच नसे. कारण मी माझे फिरतीचे दिवस पूर्ण योजनेनेच ठरवीत असे. एवंच, इतर सर्व नोकरवर्गापेक्षा माझी तळमळ व माझे कष्ट साहेबांच्या मनावर बिंबले नसतील तरच नवल.

माझ्या घरगुती बाबतीतही साहेबांचा सल्ला घेण्याचा मी प्रघात ठेवला होता व त्यांत त्यांना मोठेपणा दिलेला आवडतो हे मी चातुर्याने जाणले होते. माझ्या मुलीच्या लग्नात मी माझ्या पत्नीच्या आधी जावई साहेबास दाखवला होता व त्याच वेळी लग्न-खर्चाची काळजी वाटत असल्याचे खुबीने त्यांच्या कानी घातले होते. साहजिकच साहेबांनी ऑफिसांतून मला बिनव्याजी कर्ज दिले व दर वेळी मी माझ्या आर्थिक अवघड स्थितीची साहेबास कल्पना देत असल्यामुळे मी त्या कर्जाची काहीही फेड केली नाही. पुढे एक आदर्श सेवक म्हणून साहेबांनी ते सर्व कर्ज मला चांगल्या कामाचे बक्षीस म्हणून माफ केले व माझी युक्ती सफल झाली.

सवलतींच्या व फायद्यांचा बाबतीत नेहमीच माझा नंबर लागत असल्यामुळे मला काही वशीकरण विद्या अवगत आहे की काय असे इतरांस वाटे. परंतु वरिष्ठास काय आवडते ते ओळखून त्या-प्रमाणे युक्तीने वागणे ही खरी मेख आहे. साहेबांनी काहीही विनोद केला की पोट धरधरून हसणे, सहज बोलल्यासारखे दाखवून इतर सहकाऱ्यांचे दोष साहेबांच्या निदर्शनास आणणे, साहेबांस ज्या व्यक्ती आवडतात त्यांची स्तुती व न आवडणाऱ्या व्यक्तींची नालस्ती खुबीने करणे, या तर अगदीच मामुली बाबी. त्यामुळे साहेबांची माझ्यावर इतकी मर्जी बसली की कोणत्याही बढतीच्या वेळी माझे नाव हमखास पहिले पुढे यावयाचे व त्यामुळे मी आता एका मुख्य अधिकाऱ्याच्या खुर्चीवर बसलो असून माझ्या आधी १०।१२ वर्षे कामावर असलेले कामसू पण सरळ मार्गाने जाणारे लोक माझ्या हाताखाली काम करीत आहेत. पण मला मात्र माझ्यासारखा मनुष्य आवडत नाही. कारण, कोण प्रामाणिकपणे व कष्टाने काम करतो व कोण कामाचा देखावा करतो हे मी तावडतोब जाणू शकतो."

श्री. कुलकर्णींचे हे निवेदन उद्बोधक ठरेल का?

---

### भारतामध्ये वापरात असलेली गणकयंत्रे

पुढील तक्त्यात भारतातील निरनिराळ्या केंद्रांत किती गणकयंत्रे वापरात आहेत ते दिलेले आहे.

| केंद्र | | | गणयंत्रांची संख्या |
|---|---|---|---|
| मुंबई | ... | ... | ३७ |
| कलकत्ता | ... | ... | २३ |
| दिल्ली | ... | ... | २२ |
| बंगळूर | ... | ... | १३ |
| मद्रास | ... | ... | ७ |
| अहमदाबाद | ... | ... | ६ |
| पुणे | ... | ... | ५ |
| जमशेदपूर | ... | ... | ५ |
| हैद्राबाद | ... | ... | ५ |
| दुर्गापूर | ... | ... | ३ |
| कानपूर | ... | ... | ३ |
| इतर ठिकाणे | ... | ... | ३९ |
| | | | १६८ |

### गणकयंत्रे उत्पादन करणाऱ्या कंपन्या

या १६८ यंत्रांपैकी सर्वात जास्त म्हणजे ११५ यंत्रे आयबीएम (IBM) कंपनीची असून त्याखालोखाल आयसीएल (ICL) ३१, हनीवेल (Honeywell) कंपनीची १० व इतर कंपन्यांची १२ यंत्रे आहेत. आयबीएम, आयसीएल, एसीआयएल या तीन कंपन्याच प्रामुख्याने डिजिटल प्रकारच्या गणकयंत्रांची भारतात विक्री करतात. त्यांपैकी पहिल्या दोन कंपन्या मुख्यत्वे व्यापार-उद्योगात उपयोगी पडणारी यंत्रे पुरवितात.

(योजना, १५-९-७२)

---

### जाहिरातीत नग्नतेला प्रतिबंध

ब्रिटनमधील दूरचित्रवाणीचे कार्यक्रम एका स्वतंत्र संघटने-मार्फत प्रसारित होत असतात. दूरचित्रवाणीचा उपयोग व्यापारी जाहिरातींसाठी करण्यात येतो. अशा जाहिरातींत संपूर्ण नग्नतेला स्थान राहणार नाही, असा निर्णय संघटनेने घेतला आहे. व्यापारी जाहिरातदार नग्नता मोठ्या कुशलतेने वापरण्याची कोशीस करतात. परंतु अशी नग्नता आणि जाहिरातींमधील माल अगर सेवा ह्यांचा संबंध नसेल तर तिला परवानगी देण्यात येणार नाही. तथापि वस्त्रप्रावरणाचा अतीव संकोच करून वापरणाऱ्या तरुणी अगर धूसर काचेच्या मागे स्नान करणाऱ्या स्त्रिया दास-विण्यास मात्र बंदी केलेली नाही. भारत अद्याप चित्रपटांच्या अश्लील जाहिरातींच्या जवळपासच घोटाळत आहे.

## महाराष्ट्र बँकेचे श्री. एम. ए. केळकर ह्यांचा मृत्यू

### एक आदर्श बँकर आणि गुणी मनुष्य

महाराष्ट्र बँकेच्या डेक्कन जिमखाना शाखेचे मुख्याधिकारी श्री. एम. ए. केळकर ह्यांस पुणे येथे रूबी नर्सिंग होममध्ये देवाज्ञा झाली, हे नमूद करण्यास दुःख होते. श्री. मधुभाऊ केळकर हे १९३६ मध्ये बँकेत दाखल झाले आणि डेक्कन जिमखाना शाखेत त्यांची नंतर नेमणूक झाली. दोन वर्षांनी ते सेवानिवृत्त व्हावयाचे होते.

श्री. केळकर हे अत्यंत कर्तव्यदक्ष, कामाचा उरक असणारे परंतु हसतमुख, मनमिळावू, कर्मचाऱ्यांना समजून घेणारे आणि गिऱ्हाइकांची खऱ्या अर्थाने सेवा करणारे आदर्श बँकर होते. बँकेचे हित सांभाळून गिऱ्हाइकांना ते उत्कृष्ट मार्गदर्शन करीत असत; नकारात्मक धोरणाऐवजी मार्ग काढण्याची त्यांची प्रवृत्ती होती. त्यामुळे ते सर्व गिऱ्हाइकांना प्रिय होते. त्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी कित्येक गिऱ्हाइकांनी येऊन आपली आदरांजली वाहून हळहळ व्यक्त केली, ती उगीच नाही.

दररोज सकाळी बँकेत येताना वाटेत गुलाबाची फुले खरेदून ते टेबलावर फ्लॉवरपॉटमध्ये ठेवीत असत. त्यांच्या गौरकांतीला साजेसा त्यांचा स्वच्छ आणि नीटनेटका पोषाख असे. गिऱ्हाइकांशी बोलताना त्यांचा तोल गेल्याचे क्वचितच घडले असेल. मात्र, खट्याळ गिऱ्हाइकाला सटकावण्यास ते कचरत नसत. अप्रिय गोष्टींची जबाबदारी घेण्यास ते कचरत नसत; मुख्य कचेरीला दोष देऊन स्वतःचा चांगुलपणा मिळविणाऱ्या जातीचे ते नव्हते; ते बँकेशी समरस झालेले होते.

श्री. केळकर ह्यांना तीन मुले झाली. परंतु ती अल्पायुषी ठरली. त्याचा त्यांच्या कौटुंबिक जीवनावर परिणाम झाला असला तरी इतरांना ते नेहमीच प्रफुल्लित, उत्साही आणि कर्तव्यतत्पर असेच दिसावयाचे. त्यांच्या मृत्यूने एक आदर्श बँकरच नव्हे तर आदर्श गुणी मनुष्य नाहीसा झाला आहे.

---

### वाहतूक नियंत्रणासाठी रडारचा उपयोग

मुंबई, पुणे, नागपूर सारख्या मोठ्या शहरांतून आणि राजरस्त्यांवरून वाहनांची सतत गर्दी असते; शिवाय त्यांचा वेगही गेल्या काही वर्षांत वाढलेला आहे. त्यामुळे अपघात तर होतातच पण वाहतुकीचे नियंत्रण करणाऱ्या पोलिसांना त्यांच्या वेगाचे नीट मापन करता येत नाही व वाहतुकीच्या वेगाच्या नियमांचा भंग करणे सोपे जाते. महाराष्ट्र सरकारने चार फिरते रडार सेट्स खरेदी करून ते पोलिसांना देण्याचे ठरविले आहे. त्यांच्या साह्याने पोलिसांना वेगाने धावणाऱ्या मोटारींचे वेग अचूक सांगता येतील. ही यंत्रे हैदराबाद येथील संरक्षण खात्याच्या संशोधन विभागाने बनविली असून प्रत्येक सेटची किंमत १२ हजार, ८०० रुपये आहे.

---

### विजेचा वापर मोजा

विजेचा वापर यूनिट्समध्ये मोजला जातो. एक यूनिट म्हणजे एक किलोवॅट तास. १,००० वॅटचे उपकरण एक तास वापरले तर एक यूनिट वीज खर्च होईल. उपकरण किती वॅटचे आहे, त्याला तासांनी गुणून १,००० ने भागिले म्हणजे विजेच्या वापराचे यूनिट मिळतील.

| उपकरणाचा प्रकार | किती वॅटचे | एक यूनिटसाठी किती तास लागतील |
|---|---|---|
| गोळा किंवा ट्यूब | ४० वॅ. | २५-०० |
| ,, ,, | ६० वॅ. | १६-४० |
| ,, ,, | १०० वॅ. | १०-०० |
| पंखा ४८" ,, | ६० वॅ. | १६-४० |
| ,, ३६" ,, | ४० वॅ. | २५-०० |
| इस्त्री | ५०० वॅ. | २-०० |
| ,, | ७५० वॅ. | १-२० |
| ,, | १,००० वॅ. | १-०० |
| गीझर | १,००० | १-०० |
| एअर कंडिशनर | १ टन | १-०० |
| टेलिव्हिजन | १५० वॅ. | ६-४० |
| ,, | २०० वॅ. | ५-०० |
| ,, | २५० वॅ. | ४-०० |
| मोटर | १ अश्वशक्ती | १-२० |

---

### महाराष्ट्र बँकेची गंजपेठ ( पुणे ) शाखा

बँक ऑफ महाराष्ट्रची ३१४ वी शाखा १०२, गंज पेठ, डॉ. चिल्लाळ बिल्डिंग, पुणे येथे मंगळवार दि. १९ रोजी सायंकाळी ५-०० वाजता बँकेचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर श्री. चिं. वि. जोग यांचे हस्ते उघडण्यात आली. श्री. शशिकांत कुलकर्णी हे शाखाधिकारी आहेत.

---

### लांब अंतराच्या प्रवासी बसेसवर बिनतारी यंत्र

लांब अंतराच्या पल्ल्यावर धावणाऱ्या राज्य वाहतूक मंडळाच्या मोटारींवर बिनतारी संदेशवहनाची सोय करण्याचा निर्णय तामीळनाडूच्या सरकारने घेतला आहे. अशी सोय झाल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेला खूप मदत होणार आहे. कारण, कधी बसमध्ये बिघाड होऊन त्या मध्येच अडकतात; तर कधी अपघात होतात. कधी लुटारूंचा उपद्रव होतो. अशा वेळी नजीकच्या डेपोला अगर शहराला अशा घटनांची वार्ता कळविणे शक्य होईल. शिवाय पुढच्या तळावर किती जागा मिळू शकतील ते आगाऊ कळविता येईल. ह्या कामासाठी लागणारी यंत्रसामग्री भारत इलेक्ट्रॉनिक्सकडून मिळविण्यात येणार आहे. त्यासाठी १५ लाख रुपये भांडवली खर्च आणि दरसाल १ लाख रुपये यंत्रसामग्री सुस्थितीत ठेवण्यासाठी येणार आहे.

### श्रीमती इंदिरा गांधींच्या वाढदिवसानिमित्त जाहिराती

" पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या वाढदिवसानिमित्त कित्येक कंपन्यांनी आणि व्यक्तींनी वृत्तपत्रांत जाहिराती देऊन आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या ! आपण पुन्हा संस्थानिक आणि त्यांचे खुशामत करणारे भाट ह्यांच्या काळात गेल्याचा भास झाला ! ह्या जाहिरातींवरील खर्चाचे भागधारकांना समाधानकारक वाटेल असे समर्थन करता येईल का ? पत्राने किंवा तारेने शुभेच्छा देण्याऐवजी जाहिरातींवर भरमसाट खर्च करून जाहीरपणे शुभेच्छा देणे हे शिष्टाचारास तरी धरून आहे का ? अशा जाहिरातींमुळे कुणाचा तरी फायदा होतो का ? टाटांच्या जाहिरातीखाली " टाटा एंटरप्रायझेस " अशी सही आहे. ह्यापूर्वी टाटांना कंपनीचे पैसे खर्च करून पंतप्रधानांना जाहिरातीच्या द्वारा शुभेच्छा देण्याचा प्रसंग कधी आला होता का ? "

— ह्याचरी ( इकॉनॉमिक टाइम्स )

---

### गोवा सरकार रस्तावाहतूक ताब्यात घेणार

पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात गोव्याचे सरकार राज्यातील रस्तावाहतूक आपल्या ताब्यात घेण्याचा विचार करीत आहे. वाहतूक ताब्यात घेण्यासाठी एक योजना आखण्यात आली असून ती अमलात आणण्यासाठी मध्यवर्ती सरकारने सुमारे २ कोटी रुपयांची तरतूद करावी अशी अपेक्षा करण्यात येत आहे. गोवा सरकारचे एक अधिकारी मंडळ भारत सरकारच्या नियोजन खात्याशी चर्चा करण्यासाठी दिल्लीला गेले आहे. रोड ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशन ॲक्ट गोव्याला लागू करण्यात यावा अशी मागणी करण्यात येईल. गोव्यात निरनिराळ्या मार्गांवर वाहतूक करणाऱ्या सुमारे ६०० प्रवासी बसगाड्या आहेत. त्या दररोज अंदाजे १ लाख लोकांची ने-आण करतात. वाहतुकीच्या व्यवसायाशी संबंधित अशा लोकांची संख्या १५ हजारांच्या जवळपास आहे.

---

### वीज मुख्यत: कुठे खपते ?

| | % |
|---|---|
| ( १ ) मोठे कारखाने | ५० |
| ( २ ) इतर औद्योगिक खप | २३ |
| ( ३ ) घरगुती वापर | ७ |
| ( ४ ) व्यापारी वापर | ५ |
| ( ५ ) रस्त्यावरील दिवे | १ |
| ( ६ ) वाहतूक | ३ |
| ( ७ ) पाणीपुरवठा, शेती | १० |
| | १००% |


BANK TO BANK...

## THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659–60, Raviwar Peth, BELGAUM

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our Branches – Bombay Office at Mandvi, Bombay – 9.

OUR MOTTO IS SERVICE AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT, *General Manager.*

K. B. KIRTIKAR, *Chairman.*

## सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣

फोन नं. :-३९३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ९ )